देशोन्नती

# बोरगाव मंजू येथे सायबर सुरक्षाबाबत मार्गदर्शन

**बोरगाव मंजू** ■ येथील स्थानिक आशाताई बोर्डे माध्यमिक विद्यालय येथे सायबर क्राइमबाबत कार्यशाळा पार पडली.

यामध्ये सायबर म्हणजे काय, सायबर क्राइम कशा प्रकारे घडतात, वाढत्या सोशल मीडियाच्या माध्यमातून ऑनलाइन फसवणूक कशी होते, मोबाइलमध्ये येणारे नवीन ॲप्सद्वारे डेटा कशा प्रकारे चोरी केल्या जातो आणि त्याद्वारे कशी फसवणूक होते, व्हॉट्सॲप, फेसबुक अकाउंट हॅक कसे केले जातात, वेबसाइट्स कशा ओळखाव्या, एटीएम पासवर्ड-ओटीपी याबाबत, अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या साक्षी झोपे आणि ऋतुजा बोपुलकर यांनी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. ऑनलाइन फसवणुकीपासून कसे दूर राहावे, कोणती काळजी घ्यावी, सायबर सुरक्षा याविषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना हा उपक्रम क्विक हिल फाउंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या सहयोगाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला होता. यावेळी, शाळेचे मुख्याध्याप बोर्डे मॅडम व शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

